# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे विशेष विद्यार्थ्यांना उपयुक्त साहित्याचे वाटप

प्रतिनिधी, पुणे

**फिनोलेक्स इंडस्ट्रीजची** सीएसआर शाखा, मुकुल माधव फाउंडेशन आणि रिचमंड युनिव्हर्सिटी (लंडन) यांनी विशेष मुलांसाठी सहकार्याचा हात पुढे केला आहे. या उपक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त विद्यार्थ्यांना ३१४ चाकाच्या खुर्च्या, ३१४ कमोड खुर्च्या आणि १०० विशेष सुधारित खुर्च्या देण्यात येणार आहेत. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे सॅबिस्टियन मोनी व मुकुल माधव फाउंडेशनचे अतुल माने यांच्या हस्ते या साहित्य वाटपाचा प्रारंभ करण्यात आला.

या उपक्रमाची माहिती देताना एमएमएफच्या विश्वस्त रितु छाब्रिया यांनी सांगितले, की सातारा जिल्हा परिषदेने एक सर्वेक्षण करून सातारा जिल्हा आणि परिसरातील सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त ३१४ विद्यार्थी निश्चित केले होते. या मुलांना शाळेत तसेच घरीही समस्यांचा सामना करावा लागतो. म्हणून एमएमएफ आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजने या मुलांना प्रत्येकी चाकाची खुर्ची आणि एक कमोड खुर्ची देऊन आणखीही मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या महत्त्वाकांक्षी अशा सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षणाचा अधिकार कायद्यात सर्व मुलांना शालेय शिक्षणाच्या कक्षेत आणण्याचा उद्देश आहे.

अनेक विद्यार्थ्यांना शारीरिक विकलांगतेमुळे शाळेपासून दूर राहावे लागते. यावर उपाय म्हणून सरकारने अपंगांसाठी शिक्षण ही संकल्पना सुरू केली असली, तरी सेरेब्रल पाल्सी, बहुविध विकलांगता, अस्थिव्यंग आदी समस्या असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेपासून दूर राहावे लागते. त्यांना बसण्यासाठी, उभे राहण्यासाठी, शारीरिक स्थिती कायम ठेवण्यासाठी खास खुर्च्या व साधने लागतात आणि ही साधने महाग आहेत. अशा विशेष मुलांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी, सातारा जिल्हा परिषदेने फाउंडेशनला मदत करण्याची विनंती केली होती. श्रीमती छाब्रिया यांना लिहिलेल्या पत्रात सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील यांनी मदतीसाठीचे तपशील देऊन आणि सुधारित खुर्च्यांसाठी निधी देण्याची विनंती केली होती.